The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
======================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
------------------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024
======================================================

# मराठवाड्यातील वारकरी संत साहित्याची परंपरा

**डॉ. भास्कर गायकवाड**
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा. जि. लातूर ४१३५२१

देशाच्या सेवेला, समाजाच्या विकासाला, राबराब राबणारा, कष्टाने न दुखणारा जो ज्ञानी समाज आहे तो पुढे आला पाहिजे. भ्रामक गोष्टी सांगून जगाला फसवण्यापेक्षा खरं काय आणि खोटं काय यातला फरक समजून सांगितला पाहिजे, त्याची शहानिशा केली पाहिजे. हेच कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून संतांनी सांगितले. वारकरी संप्रदायातील संत आणि त्या संतांनी निर्माण केलेल्या साहित्या मुळेच १२ व्या शतकात आध्यात्मिक समता प्रस्थापित होऊ शकली. त्यासाठी संतांनी भक्ती आणि तत्वज्ञान यांचा संगम आपल्या साहित्यात केला. अशा कसदार साहित्याने मानवी मनावर जी पकड घेतली आहे ती अजून पर्यंत टिकून आहे कर्मकांडाचे प्रभुत्व आणि जातीभेदांनी विभागलेला समाज याला एकत्र करण्याचे काम या संप्रदायाने केले. अशा संप्रदायाची बीजे मराठवाड्यात आहे हे मराठवाड्यासाठी गौरवाची, अभिमानाची बाब आहे.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार केला तर सातवाहन, राष्ट्रकूट, यादव यांचा कर्तृत्वशाली वारसा लाभलेला मराठवाडा, गड, किल्ले, लेण्या निर्माण करणाऱ्या प्रतिभासंपन्न कलावंतांचा मराठवाडा, अशा या मराठवाड्याला 'संतांची भूमी' म्हणून ओळखले जाते. या भूमीत महानुभाव, वारकरी, वीरशैव, नाथ, सुफी,समर्थ या संप्रदायातील संतांनी लिहिलेल्या साहित्याची पाळेमुळे मराठवाड्यात पहावयास मिळतात. याच्याही आधीच्या लिखित साहित्याचा विचार केला तर, शिलालेखांचा उल्लेख करावा लागेल. मराठवाड्यात अनेक शिलालेख सापडलेत यातील संशोधनातून मराठी भाषेची पाळे-मुळे मराठवाड्यातच आहेत हे मान्य करण्यास वाव आहे. वेरूळ, अजिंठा येथील जगप्रसिद्ध लेण्या, पाटण, तुळजापूर ,औंढा नागनाथ, लिंबागणेश, वैजापूर, बिडकीन, अर्धापूर, अणदुर, औसा, बिलोली, फुलंब्री, वसमत, लातूर यासारख्या १०८ ठिकाणी असलेले शिलालेख यासाठीचे पुरावे आहेत. १२ व्या शतकापासून सुरू झालेली संतांची परंपरा महाराष्ट्रासाठी सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, दृष्टिकोनातून महत्वपूर्ण मानली जाते हे कोणीही अमान्य करणार नाही. हाच धागा पकडून प्रस्तुत शोधनिबंधात **'मराठवाड्यातील वारकरी संत साहित्याची परंपरा'** या विषयाच्या अनुषंगाने मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. संतांची परंपरा ही संपूर्ण महाराष्ट्रात पेरलेली पहावयास मिळते. त्यापैकी मराठवाड्यातील संत आणि संतांनी निर्माण केलेले साहित्य हे वैभवशाली आहे. म्हणून तर मराठवाड्यातला 'संतांची भूमी' म्हणून ओळखले जाते. प्राचीन काळापासून जवळजवळ सर्वच समाजात स्त्रियांचे स्थान हे दुय्यम राहिलेले आहे हे सत्य आहे यादव कालखंडात सुद्धा कर्मकांडाच्या गराड्यात अडकलेली, निर्बल, पराधीन अशीच स्त्रियांची स्थिती होती. "भागवत संप्रदायातील संतांनी स्त्रियांना मुक्तीची वाट मोकळी करून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला, एवढेच काय ते मध्ययुगातील आशावादी चित्र. याच बळावर महानुभाव संप्रदायातील महदंबा, आऊसा, ऊमांईसा, बाईसा आणि भागवत (वारकरी) संप्रदायातील मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, सोयराबाई आदि स्त्रियांनी आपले वांङ्मयीन आणि धार्मिक अस्तित्व सिद्ध केले.

मध्ययुगीन संतांनी स्त्री-पुरुष समानतेचा घालून दिलेला आदर्श वर्तमानातही कमी अधिक प्रमाणात दिसून येतो."१. वारकरी संप्रदायातील बहुतांश संत हे मराठवाड्यातील आहेत. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत बहिणाबाई, संत एकनाथ, संत जनार्दन स्वामी, संत गोरोबा असे कितीतरी संत मराठवाड्याच्या मातीतील आहेत. अन्याय अत्याचार आणि शोषणाच्या विरोधात आवाज उठवणारा, समाजाला ज्ञान देणारा, नवचैतन्य निर्माण करणारा, देशासाठी नवसंस्कृती घडविणारा, सामाजिक कार्याबरोबरच साहित्याची निर्मिती करणारा, मराठी भाषेला नवसंजीवनी देणारा हा वारकरी संप्रदाय आहे. अशा या वारकरी संप्रदायाचा इतिहास बहिणाबाईंनी एका अभंगात सांगितला आहे त्या म्हणतात,

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेव रचिला पाया । उभारले देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेने केला हा विस्तार ॥
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ॥
तुका झालासे कळस ।भजन करा सावकाश ॥
बहिणा फडकती ध्वजा । तेने रूप केले ओजा ॥

या बहिणाबाईंच्या अभंगांमध्ये वारकरी संप्रदायातील महत्त्वाच्या संतांचा उल्लेख आलेला आहे. भक्तीचा समन्वय साधणारा संप्रदाय म्हणून वारकरी पंथाकडे पाहिले जाते. संपूर्ण देशाला चांगली संस्कृती निर्माण करून देण्याचे कार्य या संप्रदायाने केले. बहिणाबाईंच्या उपरोक्त अभंगातून संत परंपरेचा लेखाजोखाच मांडलेला आहे. भागवत धर्माचे कळस म्हणून त्यांनी तुकोबांचा उल्लेख केला आहे. अशा या बहिणाबाई कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी येथील रहिवाशी. "रामदासानंतर समर्थ संप्रदाय जसा अगदी निष्प्रभ झाला तसे काही लगेच तुकारामांच्या पश्चात वारकरी संप्रदायाचे झाले नाही. तुकाराम भागवत धर्ममंदिराचे कळस झाले, तर त्यांची शिष्य बहिणाबाई त्या कळसावर ध्वजेप्रमाणे फडकली."२. बहिणाबाईंनी स्त्रीवादी, स्त्रीमुक्ती चळवळीचा विचार मांडला असे म्हटले तर वावगे ठरू नये. ज्या काळात वेद हे धर्माचे प्रमाण आणि स्त्री-शूद्रांना वेदांचा अधिकार नाही. अशी परिस्थिती होती त्या काळात बहिणाबाई धार्मिक बाबतीत समाजाला दोषी मानतात, आणि तुकारामांसारख्या शूद्राला गुरु मानून अभंग निर्मिती करतात वारकरी संप्रदायाने स्त्रियांना दिलेले स्थान आणि त्यांचा केलेला सन्मान, बहिणाबाई, जनाबाई ,मुक्ताबाई यांनी योग्य रीतीने करून घेतलेला उपयोग व त्यातून समाजात निर्माण केलेले स्वतःचे स्थान विचारात घ्यावे लागेल. विशेष म्हणजे या तीनही संतकवियत्री मराठवाड्याच्याच. जनाबाई परभणी जिल्ह्यातील गंगाखेडच्या तर मुक्ताबाई पैठण जवळील आपेगावच्या.

संत जनाबाईच्या अभंगातून स्त्रीवादी भूमिका स्पष्टपणे जाणवतात. विठोबाची गोडी लागल्यानंतर अभंगवाणी निर्माण झाली पण ज्यांच्या स्पर्शाने आपले सोने झाले त्या नामदेवांबद्दल आदराचा भाव कमी झाला नाही. स्वतःला मोठी न समजता 'दासी जनी' असा ती आपला उल्लेख करते. आज स्त्री जन्माचे म्हणावे तसेच स्वागत होत नाही पण, जनाबाई मात्र त्या काळात "स्त्री जन्म

म्हणवूनी । न व्हावे उदास ॥"असा विचार मांडताना दिसतात. संत जनाबाईंचा हा विचार द्रष्टेपणाचाच म्हणावा लागेल.

वारकरी संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला असे म्हणतात. अशा ज्ञानदेवांना उपदेश करण्याची ताकद त्यांच्यापेक्षा लहान असलेल्या मुक्ताबाई मध्ये आहे. समाजाने केलेल्या अन्याय, अत्याचाराला कंटाळून ज्ञानेश्वरांनी स्वतःला आत कोंडून घेतले. त्यांची समजूत काढताना संत मुक्ताबाई म्हणतात,

"मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥
संत जेणे व्हावे । जग बोलणे सोसावे ॥
तरीच अंगी थोरपण । जया नाही अभिमान ॥
थोरपण जेथे वसे । तेथे भूतदया असे ॥
योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ॥
विश्व झालीया वन्ही । संत सुखे व्हावे पाणी ॥"३

वयाने लहान पण अधिकाराने मोठी असलेली ही संतकवयित्री जो संदेश देते तो फार महत्त्वाचा आहे. मोठं व्हायच असेल तर जगाचे बोलणे सहन करावे लागेल. उपरोक्त अभंगातून दिलेला उपदेश आजही तंतोतंत लागू पडतो.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आज पंधरवाडे साजर करण्याची गरज भासते.मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळावी म्हणून आंदोलने केली जातात. पण १२ व्या शतकात मराठी भाषेला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी संस्कृत भाषेला महत्त्व असलेल्या काळात संत ज्ञानेश्वरांसारख्या लेखकाने साहित्य निर्मिती करण्यासाठी मराठी भाषेची निवड केली. मराठी भाषेच्या उन्नतीसाठी झालेला हा प्रयत्न मराठवाड्यातून झाला याचा अभिमान बाळगला पाहिजे. जो अभिमान संत ज्ञानेश्वरांनी,

"माझा मराठाची बोलु कवितके
परी अमृतातेही पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिके, मेळवीन ।"

मराठी साहित्य लेखनाची परंपरा ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' (भावार्थदीपिका) या ग्रंथाच्या पाऊल वाटेवरूनच वाटचाल करत आहे. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचे नातेच जणू ज्ञानदेवांनी त्या काळात तयार करून ठेवले. ल.रा पांगारकर म्हणतात, "महाराष्ट्रात मराठ्यांची राज्य झाली आणि गेली, पुन्हा होतील आणि जातील, पण लक्षावधी लोकांच्या हृदयात आत्म सुखाची शीतल छाया पाडणारा ज्ञानेश्वरी सारखा दैदीप्यमान हिरा हे महाराष्ट्राचे आणि मराठी भाषेचे चिरकालीनचे परमऐश्वर्य आहे".४.

मराठवाड्यात नव्हे तर संपूर्ण भारतात भक्तीची पताका पसरवणाऱ्या संत नामदेवांचा जन्म परभणी जिल्ह्यातील नरसी बामणीचा. वारकरी संप्रदायातील संतांची भक्ती केवळ श्रद्धेवर आधारलेली होती असे म्हणणे योग्य होणार नाही. कारण नामदेवाची भक्ती समता, मानवता आणि प्रेम याच्या पायावर आधारलेली होती हे लक्षात घेतले पाहिजे,जी आजच्या काळाची गरज बनलेली आहे समानतेच्या तत्त्वाचा स्विकार संत नामदेवांनी केलेला आहे. विठ्ठलाची भक्ती करणारा हा वारकरी संप्रदाय. या विठ्ठलाच्या चरणापाशी सारे जण समान आहेत अशी नामदेवांची भावना होती ती त्यांनी आपल्या अभंगातून देखील मांडलेली आहे. " देव दगडामध्ये नाही तो माणसाच्या मनामध्ये आहे असा

नामदेवांचा अनुभव आहे. या मनामधल्या देवाची भक्ती करायची तर मन निर्मळ हवे, भाव शुद्ध हवा. साधे देवाचे नाव घेत राहणे पुरे आहे. संन्यासाची आणि वनात तपश्चर्या करण्याची जरुरी नाही. नामदेवांचे भक्तीच्या वाटेवरचे हे अनुभव त्यांच्या अभंगांमध्ये उतरले आहेत".५. या काळात जातीव्यवस्था अस्तित्वात होती. व्यवसायावरून जात आणि अस्पृश्यता यानुसार समाजव्यवस्था निर्माण झालेली होती आणि त्यात कर्मकांडाने अधिकच भर घातली होती. " सुतार, लोहार, गवळी,न्हावी, शिंपी, तेली, कोळी, माळी अशा व्यवसायानुरूप जातीचे अस्तित्व या काळात होते याशिवाय क्षत्रिय, कुणबी,शुद्रातीशूद्र हे समाजाचे प्रमुख घटक होते".६. अशा समाजाला एका झेंड्याखाली आणण्याचे काम संत नामदेवांनी केले. उपलब्ध ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार सर्व दूर व्हावा म्हणून नामदेव महाराष्ट्राच्या बाहेर पंजाब पर्यंत गेलेत. तेथे शिखांचा धर्मग्रंथ 'गुरुग्रंथसाहिब' मध्ये नामदेवांची पदे समाविष्ट आहेत. आपल्या भक्तीचे तत्वज्ञान त्यांनी उत्तर भारतात प्रसारित केले. याचा पुरावा म्हणजे गुरुनानक, संत कबीर, नरसी मेहता, मीराबाई इ. उत्तर भारतीय संतांनी नामदेवांच्या कार्याचा गौरव केला आहे. महाराष्ट्रातील समाज मनावर समता, मानवता, बंधुभाव याचे संस्कार करण्याचे काम वारकरी पंथांने केले, यांचे बिजारोपण मराठवाड्यात झाले नंतर या तत्वज्ञानाचे देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीत फार मोठे योगदान आहे. एक कुशल संघटक म्हणून नामदेवांनी आपले भूमिका पार पाडली आणि सर्व जाती धर्माच्या संतांना (आठरापगड) भक्तीच्या एका झेंड्याखाली आणले. जातीनिरपेक्ष अध्यात्म विचाराची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. पहिले आत्मचरित्रकार, कीर्तन परंपरा जोपासणारे प्रवर्तक म्हणून नामदेवांच्या कार्याला सलाम केला पाहिजे. मराठवाड्यातील पुढील संतांना परंपरेची पाऊलवाट त्यांनी निर्माण करून दिली.

साहित्यनिर्मिती करताना समाजाची स्थिती आणि धार्मिक वातावरण याचे निरीक्षण आवश्यक असते. त्याशिवाय दर्जेदार साहित्य निर्माण होत नाही. संत एकनाथांनी साहित्य निर्मिती करताना हेच केले. आपल्या गुरु सोबत तीर्थयात्रा करताना त्यांनी तत्कालीन समाजाची स्थिती आणि धार्मिक वातावरण समजून घेतले. त्यांच्या सर्वधर्मसमभावाच्या, उदारपणाच्या, जातीभेद न मानण्याच्या अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. 'पैठण' या मराठवाड्यातील प्रसिद्ध धर्म क्षेत्रात संत एकनाथांचे बालपण गेले. संस्कृतच्या प्रभाव असून सुद्धा संत एकनाथांनी मराठी भाषेत साहित्यरचना केली. शांत, भक्ती, वीर, करूण अशा रसांचा अनुभव त्यांच्या साहित्यातून होतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपली साहित्यरचना केली. उर्दू, फारशी या भाषेच्या प्रभावाखाली मराठी भाषेचे अस्तित्व दाबले जात होते. संस्कृत भाषेचे पंडित मराठी भाषेला विरोध करत होते. अशा काळात मराठी भाषेत साहित्यरचना करून त्यांनी जनतेला जागृत केले. हे त्यांचे कार्य अविस्मरणीय असे आहे. चतु:श्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थरामायण, पदे, गवळणी, भारुड अशी विपुलरचना त्यांनी केली. दत्त आणि वारकरी संप्रदाय, सुशिक्षित आणि अशिक्षित, प्रपंच आणि परमार्थ, भक्तीप्रधान कविता आणि शृंगार, वीररसपूर्ण काव्य, यांचा समन्वय संत एकनाथांनी साधला म्हणून त्यांना 'समन्वयकार' म्हटले जाते. श्री.रा.द.रानडे म्हणतात त्याप्रमाणे, "प्रपंच व परमार्थ याची विलक्षण सांगड घालून संसारामध्ये असताच परमार्थ करावा हे त्यांनी जसे आपल्या उदाहरणाने सर्व लोकास शिकवले त्याप्रमाणे दुसऱ्या कोणत्याही संताने शिकवले नाही". तेरढोकीचे संत गोरोबा काका 'आपल्या कर्मातच ईश्वराचा शोध

घ्यावा' हा विचार त्यांच्या अभंगातून मांडतात. ज्यांनी आपला स्वतंत्र संप्रदाय उभा केला 'प्रपंचविज्ञान' समाजाला समजून सांगितले असे समर्थ रामदास हे मराठवाड्यातील जांब येथील रहिवाशी. वारकरी संप्रदायाचे दैवत पंढरपूरचा विठोबा या ऐवजी त्यांनी श्री हनुमान आणि श्रीराम यांची भक्ती केली. एकूणच मराठवाड्यातील संतांनी महाराष्ट्राला ज्ञानाची शिकवण दिली असेच म्हणावे लागेल.

संत साहित्याच्या उदयाच्या काळात महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती कशी होती? येथील सामाजिक सांस्कृतिक जीवन कसे होते? याची उत्तरे शोधून त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटते. अनेक वर्ष जी भाषा बोलली जाते त्या भाषेच्या साहित्याला एक विशिष्ट अशी परंपरा असते, इतिहास असतो. त्या भाषेत नवनवीन साहित्य निर्माण होते त्या साहित्याचे वाङ:मयीन परंपरेची कधी साम्याचे तर कधी विरोधाचे असे नाते असते. साहित्याची ही परंपरा मराठवाड्यात निर्माण झाली. सामान्य लोकांपर्यंत ज्ञान पोहोचविण्यासाठी बोलीभाषेतील साहित्यनिर्मिती ही ज्ञानप्रसाराला उपयुक्त ठरली. हेच खरे.

**उपरोक्त संशोधन पर लेखनातून काही निष्कर्ष जाणवले ते खालील प्रमाणे,**

संतांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असला तरी त्यांनी तत्कालीन समाज व्यवस्थेला धक्का न लावता, संतांना, स्त्री-शूद्रांना आत्म विकासाची वाट खुली करून दिली. तत्कालीन सामाजिक वर्ग व्यवस्था आणि वर्णव्यवस्था यातील भेदाची जाणीव समाजाला करून दिली आणि कार्यप्रवर्तक एकनिष्ठा साहित्यातून निर्माण केली. दया, प्रेम, शांती, करुणा, क्षमा, भूतदया, परोपकार, कर्मनिष्ठा, अशा अनेक मानवतावादी मूल्यांची जोपासना संत साहित्याच्या माध्यमातून झाली. मराठवाड्यातील संतांनी केलेल्या परिवर्तनाचे स्वरूप आज जगाने स्वीकारले आहे. ज्ञान आणि कर्म याची सांगड त्यांनी घातली होती. विवेक आणि नीतीचा प्रचार प्रसार त्यांनी केला होता. व्यक्ती कोणत्याही जाती धर्माचा असो त्याला आत्मोधाराची संधी प्राप्त करून देण्याचे काम संत साहित्याने केले. देशी भाषेचे सामर्थ्य (मराठी) आणि सौंदर्य संतांनी आपल्या साहित्यातून सिद्ध केले.

**संदर्भ सूची:-**

१.लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील मराठी वाङ:मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद,२०२१. पृष्ठ-११३.
२.शेनोलीकर.ह.श्री., प्राचीन मराठी वाङ: मयाचे स्वरूप, तृतीय खंड, मोघे प्रकाशन, कोल्हापूर.,१९८७,पृष्ठ,१६०.
३.नशिराबादकर.ल.रा.,प्राचीन मराठी वाङ: मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर., १९९५ पृष्ठ-८३
४.गिरधारी भास्कर, मध्ययुगीन वाङ:मय प्रवाह, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२, पृष्ठ-६३.
५.गिरधारी भास्कर, मध्ययुगीन वाङ:मय प्रवाह, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२, पृष्ठ-६६.
६.सातभाई श्रीनिवास, प्राचीन महाराष्ट्र: परंपरा आणि समृद्धी., रश्मी पब्लिकेशन, नांदेड. पृष्ठ १२६.